महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ) तथा उपमुख्य निबंधक (जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०

मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०

फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२

ई-मेल crs_d83@yahoo.com


**परिपत्रक क्रं.७** क्र.आमाजिआ/कक्ष-८३/जन्म ठिकाण नोंद / 12856-12716 /१६

दिनांक २९ /११/२०१६

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

विषय :- आरोग्य संस्थेमार्फत जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत स्पष्टीकरण ...

संदर्भ :- उपमहानिबंधक भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र क्रं १/१२/२०१४- vs(crs) दिनांक २४/०२/२०१६.

उपरोक्त विषयाबाबत केंद्र शासनाकडून आरोग्य संस्थेत होणाऱ्या जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदणीबाबत मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. केंद्रीय जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ८(१)(ब) मधील तरतूदीनुसार ज्या जन्म-मृत्यू घटना खाजगी व सरकारी रुग्णालयात (जन्म-मृत्यू नोंदणी केंद्र नसलेल्या संस्था) घडणाऱ्या घटनांची माहीती नोंदविण्यास **संबधित निबंधक,जन्म-मृत्यू यांना विहीत नमुन्यात व विहीत वेळेत पुरविण्याची जबाबदारी त्या संस्था प्रमुखाची आहे**.जन्म-मृत्यू घटनेची माहीती निबंधकास प्राप्त झाल्यानंतर त्या घटनेची नोंद निबंधक/उपनिबंधक घेतात व जन्म व मृत्यू चे प्रमाणपत्र अनुक्रमे नमुना क्रं ५ व ६ मध्ये संबंधितांना वितरीत करतात.

आरोग्य संस्थेमध्ये घडलेल्या जन्म-मृत्यू घटनांची माहीती विशेषतः खाजगी संस्था त्यांच्या संस्थेमध्ये घडलेल्या घटनांची माहीती संबधित निबंधक,जन्म-मृत्यू यांना कळवित नसल्याचे दिसून येते. तर संबधित कुटुंबाला त्यांचे स्तरावर दवाखाना सोडताना “जन्म/मृत्यू दाखला” अशा नावाने अनौपचारीक प्रमाणपत्र देण्याचा कल दिसून येतो. **जन्म/मृत्यू प्रमाणपत्र देण्याचे अधिकार केवळ निबंधक,जन्म-मृत्यू यांना असल्याने अशा संस्थानी वितरीत केलेले दाखले ग्राहय नाहीत**. खाजगी आरोग्य संस्थेने दिलेले जन्म-मृत्यू प्रमाणपत्र कायदेशीर असल्याचे कुटुंबियाकडून गृहित धरले जाऊन निबंधकाकडून प्रमाणपत्र प्राप्त केले जात नाही. त्यामुळे कालांतराने अशा कुटुंबियांना निबंधकाकडून विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास अनेक अडचणीना सामोरे जावे लागते.

यास्तव आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी व शासकीय संस्थाना (जन्म-मृत्यू नोंदणी केंद्र नसलेल्या संस्था) जन्म-मृत्यू प्रमाणपत्राबाबत पुढील सूचना अवगत कराव्यात. खाजगी आरोग्य संस्थेने त्यांचे संस्थेचे नाव असलेली व घटनेची माहीती देणारी पावती(स्लीप) छपाई करुन संबधित व्यक्तीना देणेत यावी.

संबधित **नागरिकानी जन्म-मृत्यू दाखला मिळण्यासाठी, निबंधक,जन्म-मृत्यू** .........(येथे ग्रामपंचायत/नगरपंचायत/नगरपालिका/महानगरपालिक/कॅन्टोमेन्ट बोर्ड/ॲर्डिनर्स फॅक्टरी) **यांचे कार्यालयातून प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे,** अशा सुचना पावतीमध्ये समाविष्ट करुन संबधितांना देण्यात याव्यात. तसेच **"या संस्थेमध्ये घडलेल्या जन्म-मृत्यू घटनाच्या माहिती बाबत दिलेली स्लीप (पावती) अधिनियमानुसार ग्राहय नाही, या पावतीच्या आधारे या गावातील निबंधक जन्म-मृत्यू यांचे कडून प्रमाणपत्र प्राप्त करावे".** अशा आशयाची **नोटीस जिथे जन्म-मृत्यू घटना घडतात त्या सर्व खाजगी व सरकारी (जन्म-मृत्यू नोंदणी केंद्र नसलेल्या संस्था) आरोग्य संस्थाना त्यांचे रुग्णालयाबाहेर लावणे बंधनकारक** असल्याचे आदेशीत करावेत.

या सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व निबंधक,जन्म-मृत्यू यांच्यामार्फत सर्व खाजगी व सरकारी (जन्म-मृत्यू नोंदणी केंद्र नसलेल्या संस्था) आरोग्य संस्थाना सूचित करावे. तसेच आपण केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे.

सोबत- संदर्भीय पत्राची प्रत

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत सादर :-
मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
प्रत सस्नेह :-
उपसंचालक, आरोग्य सेवा परीमंडळ, ............ (सर्व)
Copy Submitted To :-
Dy.Registrar General (CRS),V.S.Division,West Block-I,R.K.Puram,New Delhi-110066.

2/- With Respect to your lettar No.1/12/2014-vs(CRS) Date 24-02-2016 All Registar in Rural and Urban Area is instructed accordingly.